स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच्.डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

रासेयो/२०२२–२३/९२०                                                                 दि. २८/१/२०२३

**प्रति,**

**मा. प्राचार्य/संचालक**
**रासेयो संलग्नित महाविद्यालये व परिसंस्था**
**फक्त पुणे व पिंपरी–चिंचवड शहर**
**विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग, पुणे**

विषय : **आर्ट ऑफ लिव्हिंग प्रणित "EduYouth Meet" उपक्रमाच्या नियोजन बैठकीकरिता उपस्थित राहणेबाबत**

महोदय/महोदया,

आर्ट ऑफ लिव्हिंगने कोविड काळात युवक, विद्यार्थी तसेच कोविड बाधित रूग्ण, नागरिक व त्यांचे कुटुंबिय यासर्वांसाठी एकत्रितरित्या मनोस्वास्थ्य वर्धन करणारे, आत्मविश्वास पुनर्जागृत करणारे अनेकविध उपक्रम राबवून जनजीवन सुरळीत करण्याच्या दृष्टीने भरीव सहभाग घेतलेला आहे. आर्ट ऑफ लिव्हिंगच्या या कार्याला केंद्र व राज्य शासन, विविध प्राधिकरणे व संस्था तसेच अनेक विद्यापीठांनी देखिल सकारात्मक मान्यता दिलेली आहे. अशा समाजाभिमुख उपक्रमांचे आयोजन निरंतर व्हावे व शैक्षणिक संस्था, विद्यापीठे व संबंधीत यंत्रणांनी त्यात सहभागी व्हावे या दृष्टीने यु.जी.सी.ने देखिल निर्देशित यापुर्वी केलेले आहे.

यानुसार आर्ट ऑफ लिव्हिंग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व आपल्या प्रथितयश संस्थेच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२३ रोजी सायं ०६.०० ते ०९.०० या कालावधीत पुणे येथे सुर्यकांत काकडे फार्मस्, कोथरूड, पुणे या ठिकाणी १,००,००० (एक लाख) विद्यार्थ्यांचा भव्य युवा मेळावा आयोजित केलेला आहे. सांस्कृतिक कार्यक्रम, तज्ञांचे मार्गदर्शन, उपस्थितांद्वारा अमंली पदार्थ विरोधी संकल्प व प्रतिज्ञा असे या कार्यक्रमाचे स्वरूप असून, या युवा मेळाव्यामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत १,००,००० (एक लाख) स्वयंसेवक पाठवण्याचा संकल्प आहे. याबाबत यापूर्वि विविध नियोजन बैठकांद्वारे कार्यक्रम अधिकाऱ्यांना माहिती देण्यात आलेली आहे.

सदर उपक्रमाच्या आयोजनाकरिता **पुणे व पिंपरी–चिंचवड शहरातील एककनिहाय सर्व कार्यक्रम अधिकारी यांची नियोजन सभा, बुधवार, दिनांक ०१/०२/२०२३ रोजी, दुपारी १.०० वाजता संत नामदेव सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ** येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

तरी आपल्या महाविद्यालयातील एककनिहाय सर्व कार्यक्रम अधिकारी यांना उपरोक्त ठिकाणी व दिलेल्या वेळेत अनिवार्यपणे उपस्थित राहण्याबाबत सूचित करावे, तसेच सदर कालावधीत सदर प्राध्यापकांची कर्तव्य रजा मंजूर करण्यात यावी. कळावे, ही विनंती.

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**